**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**17, आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे-411 001.**
Website-www.jhepune.info.
E- mail-adim@jdhepune.info.
फोन नं.020. 26127833/26051632
फॅक्स नं.020. 26127833

क्र.सस/उशि/पुवि/नार्को/2025 1776
दिनांक-26.8.2025.

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
अशासकीय अनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान
विधी व शिक्षणशास्त्र महाविदयालये,
पुणे जिल्हा.

विषय- जिल्हास्तरीय नार्को को ऑनिशन सेंटर समितीसाठी महाविदयालयामधील समन्वयक यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देणेबावत.

संदर्भ- मा.पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण तथा NCORD सदस्य सचि व यांचेकडील जा.क्रस्था.गु.शाखा पुणे ग्रा/नार्को-को ऑर्डीनेशन सेंटर बैठक/5006/2025,दिनांक-28.8.2025.

उपरोक्त विषयास अनुसरून पुणे जिल्हयातील वाढत्या अंमली पदार्थाच्या वापरावर आळा घालण्यासाठी तसेच क्षेत्रीय स्तरावरील अंमली पदार्थ बावतची समस्या प्रभावीपणे हाताळण्यासाठी नार्को को ऑर्डनिशन सेंटर समिती गठीत करण्यात आलेली आहे.या कार्यालयाची सदस्य म्हणून मा.जिल्हयाधिकारी कार्यालयाने नेमणूक केलेली आहे.

याबावत महाविदयालयीन स्तरावरती समन्वयक यांची नेमणूक करण्यात आलेली होती व त्याप्रमाणे महाविदयालयांनी , नेमलेल्या समन्वयकांची माहिती गुगल डॉक्स वरती भरलेली होती.

आजच्या तीव्र स्पर्धेच्या, धावपळीच्या जगात टिकून राहण्यासाठी तरूण वर्ग सातत्याने प्रयत्नशील राहतो, परंतू पावला पावलांवर असलेल्या स्पर्धेमध्ये सततच्या अपयशाने कधी कधी मनाने खचून जातो. व त्यामधून आलेल्या नैराश्याचा थोडा तरी विसर पडावा म्हणून कळत नकळत अंमली पदार्थाच्या आहारी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नकळत घेतलेल्या अंमली पदार्थाच्या आहारी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नकळत घेतलेल्या अंमली पदार्थाच्या सेवनामुळे , त्यांना अंमली पदार्थ्यांचे व्यसन लागून नवतरूण वर्गाचे आयुष्य उध्दवस्त होऊ शकते, अंमली पदार्थाच्या वापरामुळे त्यांच्या आयुष्यात कधीही न भरून निघणारे नुकसान होऊ शकते. नवतरूण वर्ग व्यसनांच्या आहारी जाऊ नये म्हणून यावावत तरूणांमध्ये जागृती निर्माण होणे आवश्यक आहे.

संदर्भिय पत्रान्वये दि.30.7.2025 रोजी जिल्हास्तरीय नार्को को ऑर्डनिशन सेंटर समितीची वैठक मा.जिल्हाधिकारी ,पुणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. उक्त वैठकीमध्ये पुणे जिल्हयातील महाविदयालयांनी अंमली पदार्थाच्या दुष्परिणामावावत जनजागृती विदयार्थ्यांमध्ये निर्माण करणेसाठी दरमहा चर्चासत्र घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंमली पदार्थांमुळे होणारे शारिरीक, मानसिक तसेच कायदेशीर परिणाम आणी त्यावरती प्रतिबंधक उपायांवर महत्वपूर्ण माहिती विदयार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे.

मित्र समूहांचा दबाव कसा टाळायचा / अंमली पदार्थाचा सापळयापासून स्वत : ला कसे वाचवावे याची देखील माहिती असणे आवश्यक आहे.या व अशा प्रकारची माहिती विदयार्थ्यांना मिळावी म्हणून त्याकरिता कायदेशीर तज्ञ, पोलिस अधिकारी, वैदयकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन /प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करावीत. व्यासनमुक्तीसाठी रॅलीचे आयोजन करावे.

महाविदयालयाच्या आसपासच्या परिसरामध्ये अंमली / नशिल्या पदार्थांची विक्री होत असल्यास त्याची माहिती पोलीसांना देण्यात/कळविण्यात यावी. पोलिसांना माहिती देणा-यांची नांवे गुपित ठेवण्यात येईल. दिनांक-30.7.2025 रोजीच्या बैठकीदरम्यान पोलिस खाते यांचेकडून मिळालेल्या सूचना महाविदयालयास कळविण्यात येत आहेत.

महाविदयालयाने केलेली कार्यवाही दरमहा आयोजित होणा-या नार्को को ऑर्डनिशन सेंटर समितीच्या बैठकीमध्ये देणे आवश्यक आहे.महाविदयालयामध्ये नेमण्यात आलेल्या समन्वयक यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दरमहा ज्या त्या महिन्याच्या वेतन देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 26-08-2025
17:23:44

(डॉ.अशोक उबाळे)
सहसंचालक,(उच्च शिक्षण)
पुणे विभाग,पुणे.